www.esakal.com

सकाळ

मुंबई । शुक्रवार, ५ एप्रिल २०१३ । किंमत ₹ ३ । पाने १८ (६ पानी टुडेसह) + फॅमिली डॉक्टर

# अक्षरा प्रतिष्ठानतर्फे आवाहन

शहापूर, ता. ४ : वाशिंद येथील शेई गावात अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक क्षेत्रात काम केले जाते. या उपक्रमांतर्गत आदिवासी पाड्यातील शाळेमध्ये जाऊन मुलांची शाळेतील उपस्थिती वाढविणे, त्यांना मोफत वह्यावाटप, गणवेश देणे, पोषक आहार पुरविणे, आरोग्य शिबिर घेणे असे उपक्रम सातत्याने हाती घेतले जातात. निधीअभावी मर्यादित स्वरूपात संस्थेचे काम चालते. अधिक व्यापक स्वरूपात जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांपर्यंत संस्थेचे कार्य पोहोचावे, यासाठी मदत करण्याचे आवाहन 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान'तर्फे करण्यात येत आहे. इच्छुकांनी आपली मदत 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान', बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा लालबाग, खाते क्र. ६००४४२३३९८१ येथे धनादेशाद्वारे पाठवावी. अधिक माहितीसाठी सीताराम परब (९८२०४९७७४९), मधुकर वर्दम (९९८७७९७७७६) यांच्याशी संपर्क साधावा.